# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दि.१६-३-०६ रोजी तहकूब करण्यात आलेली व दि.१७.०३.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२९) इतिवृत्त

१६-३-२००६ रोजी तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा **शुक्रवार दिनांक १७ मार्च २००६** रोजी मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह'' येथ सकाळी ९.३० वाजता सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजीब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०५) श्री.जंजाळकर संतोष सुधाकर
(०६) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०७) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०८) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(०९) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१०) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(११) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१२) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१३) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**विषय क्र.२७५ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९६ अन्वये सन २००५-२००६ चे सुधारित व सन २००६-२००७ चे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :** (अर्थसंकल्पावरील चर्चा पुढे चालू...)

श्री. मुजीब खान : स. सदस्य श्री. जवेद हसन खान यांचा मुलगा पै.आफताब हसन खान यांचा काल विजेचा शॉक लागून मृत्यू झला त्यांना सभासगृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती : सर्वानी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे व श्रध्दांजली अर्पण केल्याचे पत्र देवून स. सदस्य श्री.जवेद हसन खॉन यांचे कुटूंबीयांना शोक संदेश पाठविण्यात यावा.

(याच वेळी स. सदस्य श्री. जवेद हसन खान याचा मुलगा पै.आफताब हसन खान यांचे अपघाती निधनाबद्दल सभागृहा तर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

सौ. लता दलाल : हेड वाईजचर्चा केली तर योग्य होईल.

श्री.मुजीब खान : कालच्या बैठकीत आपण वसूलीच्या संदर्भात वार्ड कार्यालयाकडून माहिती घेतली वसूलीच्या संदर्भात वार्ड कार्यालय क च्या संदर्भात मी यापूर्वीही चर्चा केली होती की वसूलीचे रजिस्टरमधे पाने फाटलेली होती ते रजिष्टर आतापर्यत जमा नाहीत.५५,०५० पावती होती. त्यामधे रेकॉर्डला ५,०५० रूपये करण्यात आले. या संदर्भात चौकशी अहवाल समोर आला की, त्यासंबधी माहिती या सभागृहात सादर करण्याचे आदेशीत केलेले होते, माहिती द्यावी.

मा.सभापती : विधानसभेचे सभेचे बजेट चालू आहे. महानगरपालिकेसबंधी तेथे काही प्रश्न उपस्थित झालेले आहे. त्यासाठी मा.आयुक्त तेथे उपस्थित राहणार असल्यामूळे सभेला उपस्थित नाहीत. आजच्या कामकाजची जबाबदारी उपआयूक्त(महसूल) व (प्रशासन) यांचेवर सोपविलेली आहे. हेडवाईज चर्चा करावी त्यानुसार योग्य तो खूलासा मागवून निर्णय घेता येईल. जकात विभागावर चर्चा करावी. जकातीचे खाजगीकरण केलेले असून १०१ कोटी २५ लक्ष मधे खाजगीकरण करण्यात आले आहे. समान हप्त्यात सदर ठेकेदार महापालिकेस रककम देईल. वेळोवेळी ज्या समस्या येतील त्यावेळी चर्चा करता येईल परंतू जेउद्दिष्ट दिलेले आहे तेच ठेवावे लागेल.

श्री. संतोष जेजूरकर : जकात चोरी किती होते मागिल वर्षी किती झाली व गेल्या १७ दिवसात किती जकात चोरी झालेली आहे व किती दंड आकारला गेलेला असून सदर रक्कम संबधीत ठेकेदारास कि महापालिकेस मिळते याचा खूलासा करावा.

मा.सभापती : दंडाची रक्कम अभिकर्ता यांना मिळत नाही महापालिकेच्या खात्यात जमा होते.किती दंड आकारणी केली या संदर्भात स.सदस्य यांना लेखी माहिती संबधीत अधिकारी देतील.

श्री.मुजीब खान : संबधीत जकात अभिकर्ता दररोजकिती वसूली करीत आहे महापालिकेकडे किती हप्त्यात रक्कम जमा करणार आहे या बाबतीत खूलासा दयावा.

मा.सभापती : ५२ हप्त्यात जमा करणार आहे. २ कोटी २ लक्ष ५० हजर रूपये प्रत्येक सप्ताहात जमा करणार आहे. जमा केले नाही तर २५% व्याजआकारले जईल. आज रू.२ कोटी २ लक्ष ५० हजर आठवड्याला मिळते.

उपआयुक्त (म) : मार्चपासून जकात वसूलीचाठेका खाजगी अभिकर्ता यांचेकडे देण्यात आलेला असून दररोज जी वसूली होते त्याची माहिती दर आठवड्याला सदर एजन्सी सादर करते. १५ तारखेपर्यत किती वसूली झालेली आहे त्याची माहिती आलेली आहे. वसूली ही १६ लक्ष पासून ते ३१ लक्ष अशी दर दिवशी वेगवेगळी वसूली आहे.त्याची माहिती १० मिनिटात सदस्यांना उपलब्ध करून दिली जईल.दर शुक्रवारी सदर एजन्सी महापालिकेला २कोटी २ लक्ष ५० हजराचा हप्ता देते त्यातील एक कोटी ही रक्कम परस्पर महानगरपालिकेच्या खात्यामधे जमा होते.

श्री.मुजीब खान : जेव्हा महानगरपालिका जकात वसूली करीत होते तेंव्हा २२ लक्षच्या वर गेलेले नाही. आताच खूलासा झाला की ३० लक्ष पर्यत वसूली गेलेली आहे. संबधीत ठेकेदार उपआयुक्त यांचेशी कालच चर्चा करीत होते मीही बाजूला बसलेलो होतो त्याची असे म्हटले की ३८ लक्ष पर्यत दररोजची वसूली होत आहे. याचा अर्थ १०ते१५लक्षचे दररोजचे नुकसान होत होते. प्रशासन व मा. सभापती यांचे अभिनंदन करतो की या शहरासाठी २० ते २५ कोटी रूपये विकास कामासाठी जकात खाजगीकरण केल्यामुळे येतील. नाक्यावर वर जे वाद होत आहे त्या संदर्भात प्रशासनाने दखल घ्यावी.

मा.सभापती : वार्ड कार्यालय निहाय मालमत्ता किती आहे. मालमत्ता कर किती व उद्दिष्ट किती दिले होते. किती वसूली केलेली असून वसूलीचे टक्केवारी किती येते याचा वार्ड कार्यालय निहाय खूलासा करावा प्रथमत: वार्ड कार्यालय अ चे अधिकारी युांनी खूलासा करावा.

वार्ड अधिकारी-अ : या कार्यालयांतर्गत २१३२१ मालमत्ता येतात. एकूण १६ प्रभाग येतात. वसूलीचे उद्दिष्ट ४.६३ कोटी दिलेले आहे. चालू मागणी यात समावेश केलेली आहे काही न्यायप्रविष्ट प्रकरणे आहेत. १.८६ कोटी चालू मागणी आहे. आतापर्यत १.८५ कोटी वसूल करण्यात आलेले आहे. आणखी पूढील दिवसात ४५ लक्ष वसूल होतील अशी अपेक्षा आहे. वसूलीचे प्रमाण ३९.९५% येते.

श्री. मुजीब खान : न्याय प्रविष्ट प्रकरण किती आहे. पार्टीचे नाव व किती दिवसापासून पेंडींग असून किती रक्कम त्यांचेकडे थकबाकी आहे याचा खूलासा करावा.

सौ. लता दलाल : मोठे थकबाकीदार किती आहे. न्याय प्रविष्ट प्रकरण किती आहे. जे कर भरू शकतात अशा लोकांची नावे सांगावी. तसेच आज सकाळी डॉ. झवर यांचा दुरध्वनी आला होता त्याचा व्यक्ती कर भरण्यासाठी वार्ड कार्यालय ड मधे एक तास बसून होता. तेथील कर्मचारी यांनी असे सांगितले की आपल्या मालमत्तेचे रजिष्टर येथे नाही वसंतभूवन येथे जवे. तेथून तो व्यक्ती मुख्य कार्यालयात आले. तेथे आल्यानंतर त्या व्यक्तीला असे सांगण्यात आले की रेकॉर्ड शोधावे लागणार आहे आपण उदया यावे. दोन वार्ड कार्यालयात नागरीकांना फेऱ्या माराव्या लागातात. ही तिसरे प्रकरण माझ्याकडे आलेले आहे. ज्याची नावे इतर ठिकाणी गेलेली आहे त्या वसूलीसाठी मुख्य कार्यालयातच कुणीतरी वसूलीसाठी कर्मचारी ठेवावे. या संदर्भात मी मा. आयुक्त यांना बोलले तसेच स्थायी समितीच्या बैठकीतही चर्चा झालेली होती. परंतू त्याची दखल घेतली जत नाही.

श्री. संतोष जेजूरकर : राजबाजर भाग प्रभाग-क मध्ये येतो, उर्वरीत लोकांनी जयचे कुठे? माझ्या वार्डातील गादीया पार्क म्हणून वसाहत असून बाकीचा भाग स्लम आहे. स्लम भाग वार्ड कार्यालय क मधे रक्कम भरतात परंतू गादीया पार्क येथील लोकांनी कर कुठे भरायचा कळायला मार्ग नाही.

श्री. मिलींद दाभाडे : माझ्या वार्डातील सोनकाबळे म्हणून नागरीक आहे त्यांनी पाणीपट्टी भरल्याच्या पावत्या असून आता त्या बाबतचे रेकॉर्ड सापडत नाही. संबधीत महिला चार पाच वेळेस कार्यालयात येवू गेलेली, योग्य मार्गदर्शन नाही.

वार्ड अधिकारी-अ : एकूण न्यायप्रविष्ठट प्रकरण १०६ असून १.२१ कोटी थकबाकी त्यांचेकडे आहे. या विभागाचा पदभार मी ऑक्टोबर मधे घेतलेला आहे. काही न्याय प्रविष्ठ प्रकरणाच्या बाबतीत विधि सल्लागार यांचे सल्ल्याने काही प्रकरणाच्या रक्कमा अंडर प्रोटेस्ट भरून घेतलेल्या आहेत.

श्री.मुजीब खान : आपण चार्जघेतल्यापासून न्याय प्रविष्ट प्रकरणाच्या बाबतीत काय पावले उचलली आहे .

वार्ड अधिकारी-अ : मा. उपआयुक्त विधी सल्लागार व ज्याचे प्रकरण कोर्टात आहे अशा लोकांना सूनावणीसाठी समक्ष बोलविण्यात आले होते. काही लोकांनी अंडर प्रोटेस म्हणून रक्कमा भरणा केलेली आहे. रू.३,६६,०००/- वसूल झाले आहे.

श्री. मुजीब खान : प्रलंबीत प्रकरणाबाबत विधी सल्लागार डायरेक्शन देतात की नाही. न्यायालयात सुनावणीच्या वेळी कूणी जते की नाही महानगरपालिकेचे वकील तेथे असतात की नाही माहिती घेतली असता अनेक प्रकरण कोर्ट पूढील तारीख देतात वकीलांना विचारणा केली असता असे कळते की महानगरपालिकेकडून कोणतेही कागदपत्र व जबाब आमच्याकडे येत नाही. अनेक प्रकरण पेंडींग राहतात. तारीख दिल्या जते. महानगरपालिकेचा काही दिवसानंतर महानगरपालिकेच्या विरोधात निकाल लागला जतो यात महानगरपालिकेचे नूकसान होते. अतिक्रमणासंबंधी व इतर किती प्रकरणात महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लागलेला आहे याचा विधी सल्लागार कडून खूलासा घेण्यात यावा.

मा. सभापती : सर्व वॉर्ड अधिकारी यांना सूचना करण्यात येते की, वसूलीबाबत ठोस काय कार्यवाही केली, वॉर्ड कार्यालयास वाहन दिलेले आहे. महानगरपालिकेमार्फत पाहिजे तशी वसुली का करण्यात येत नाही. वसूलीत टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास आल्यास वेतनवाढ रोखण्यासाठी सभागृहाला निर्णय घ्यावा लागेल. वस्तुस्थिती सांगावी. गेल्या अनेक वर्षापासून न्यायालयीन प्रकरणात स्वत:चे प्रकरण म्हणून पाहिले जत नाही. वकीलांचे पॅनल बदलण्याबाबत अनेक वेळा सांगण्यात आले. काय अडचण आहे? किती वकील आपल्या पॅनलवर असून किती केसेस जिंकल्या, किती फिस दिलेली आहे, कोणाच्या मंजूरीने दिले. ज्या त्या वॉर्ड कार्यालय अंतर्गत मालमत्ता कराच्या संदर्भात न्यायप्रविष्ट प्रकरणे आहेत त्याची यादी सर्व स.सदस्यांना देण्यात यावी. विधी सल्लागार हे पद किती वर्षापासून रिक्त आहे? कोणाची वाट पाहिली जते. आता वॉर्ड अधिकारी-अ यांनी कमी वसुली का झालेली आहे याचा सविस्तर खुलासा करावा.

उप आयुक्त (प्र) : जिल्हा न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे बार असोसिएशनला पत्र दिलेले आहे. व त्यांना यादी पाठविण्याबाबत विनंती केली आहे. ती प्राप्त झाल्यावर छाननी करून निवृत्त न्यायाधिश व मा.आयुक्त यांचे सह विचारविनिमय करून नविन वकीलांचे पॅनल नियुक्त करण्याची कार्यवाही करणेस विधी सल्लागार यांना सूचना दिलेल्याआहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : आजवकीलांचे पॅनल कार्यरत आहे. २०० ते २५० प्रकरणे चालू आहेत. ७०% प्रकरणात महानगरपालिकेचे वकील हजर राहात नाहीत. वकीलपत्र दिलेले नाही. २-३ वेळा अनुपस्थित राहिल्यास समोरच्या बाजूने निकाल लागतो. आपले विधी

विभाग अनधिकृत इनव्हॉल्व आहे. सुनिल गादीया विरूध्द अझरोद्यीन या प्रकरणात मागील वर्षात वकीलपत्र दिले.

विधी सल्लागार : सुनिल गादीया प्रकरणाच्या बाबतीत वकील पत्र दिलेले आहे. ॲड. अंदवत यांना वकील पत्र दिलेले आहे. या दोन सारखेच प्रकरणा आहे एका प्रकरणात जबाब आणखी दाखल होणे बाकी आहे.एका प्रकरणात झालेला आहे. श्री. गादीया यांचे असे म्हणणे होते की यामधे वकील बदलून द्यावे अजून वकील बदलून दिलेले नाही.या प्रकरणात ॲडव्होकेट अंदवत हे काम पाहत आहे.

सौ. लता दलाल : श्री.गादीया यांना महानगरपालिकेचे वकील बदलून कशासाठी पाहिजे त्याचा काय हक्क आहे. वकील पत्र देण्याचे थांबविले का?

विधी सल्लागार : सारख्याच स्वरूपाची दोन प्रकरणे आहे. एका प्रकरणात ॲड. अंदवत हे काम पाहत होते .

श्री.रेणूकादास वैद्य : आताच खूलासा केला की दोन सारखेच प्रकरण आहे एकात जबाब दिला एका प्रकरणात का दिलेला नाही. केव्हा पासून प्रलंबीत आहे. विलंब का झालेला आहे.

विधी सल्लागार :वकीलाकडे माहिती दिलेली आहे परंतू आतापर्यत जबाब दाखल झालेला नाही ही वस्तूस्थिती आहे.

मा.सभापती : या संदर्भात उपआयूक्त प्रशासन यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (प्र) : या बाबत वकीलाशी तसेच विभाग प्रमूखाशी चर्चा करून महानगरपालिकेची बाजू मांडण्यासाठी प्रकरण दाखल केले जईल याची दखल घेण्यात येईल.

विधी सल्लागार : त्वरीत जबाब दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल. जबळपास ५ ते ६ महिण्यापासून प्रकरण चालू आहे. या वर्षातील प्रकरण आहे. आणि जबाब देण्यासाठी वेळ मागवून घेण्यात आलेला आहे. त्यामूळे सध्या जबाब प्रलबींत आहे.

श्री. शंशाक विसपूते : महानगरपालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण असावे यासाठी विधी सल्लागार आहे. त्याचे उत्त्तर असे की सहा महिने प्रकरणास झाले महापालिकेकडून अदयाप जबाब दिला नाही. वैयक्तिक मालमत्ता असती तर इतका वेळ विलंब केला असता का हा सूध्दा प्रश्न आहे.

श्री. मुजेब खान : किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत किती वर्षापासूनची आहेत तसेच किती प्रकरणात महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लागलेला आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : सहा महिण्यापासून महापालिकेच्या वकीलाच्या वतीने जबाब दाखल करण्यात आलेला नाही. जे विलंब झालेला आहे त्या बाबतीत कुणावर तरी जबाबदारी निश्चित करावी. कार्यवाही झाली पाहिजे तरच असे प्रकार यापूढे होणार नाही.

विधी सल्लागार : या प्रकरणात सात दिवसात जबाब दाखल करण्यात येईल.सदर प्रकरणात श्री. अदवंत ॲडव्होकेट यांचेकडे माहिती दिलेली आहे.

सौ. लता दलाल : सात दिवस कशासाठी पाहिजे सोमवारी का जबाब दाखल करू शकत नाही.

श्री. मुजेब खान : या संदर्भात योग्य ती माहिती मिळणार नाही. यासाठी किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे किती प्रकरणाचा निकाल लागलेला आहे केव्हीपासून कोणते प्रकरण न्यायालयात आहे. महापालिकेच्या बाजूने किती प्रकरणात निकाल लागलेला आहे या सर्व बाबतीत माहिती घेण्यासाठी विशेष स्थायी समिती सभेचे आयोजन करावे.अनेक मोठमोठी प्रकरणे हेतू पूरस्सर प्रलंबीत ठेवलेले आहे. त्या प्रकरणाची

कोणतीही कागदपत्र महापालिकेकडे नाहीत.कोर्टात तारीख दिली जत आहे. ज्या प्रकरणात नगरसेवक व अधिकारी यांनी जतीने लक्ष दिले तर त्याच प्रकरणाचा पाठपूरावा होतो.अनेक प्रकरणे कागदपत्र विना प्रलबींत आहे. प्रत्यक विभागाच्या कोर्ट केसेसमधे अशाच पध्दतीने कार्यवाही होत आहे. सर्व प्रकरणाची माहिती सर्व सदस्यांना देण्यात यावी जेणे करून त्यात काय कमी आहे हे आम्हाला बघता येईल. पूढील कार्यवाही करता येईल.

श्री. मिलींद दाभाडे : न्याय प्रविष्ठ प्रकरणाचा आढावा उपआयुक्त किती दिवसानंतर घेत असतात याचा खूलासा करावा.जे जे प्रकरण प्रलंबीत राहतात. विभाग प्रमूख म्हणून उपआयुक्त यांची काही जबाबदारी नाही का?

श्री.विनायक पांडे : माझ्या माहिती प्रमाणे अनेक प्रकरणात महापालिकेच्या बाजूने निकाल लागलेला असून त्याही जगा महापालिकेने ताब्यात घेतलेल्या नाही.

उपआयुक्त . (प्र) : न्याय प्रविष्ठ प्रकरणाच्या बाबतीत मी दर महिन्याला आढावा घेत असतो. किती प्रकरणे दाखल झाली व किती निकाली निघाले, बरेच वेळा संबंधीत विभागाकडून कागदपत्रे मिळत नाही. काही प्रकरणात कोर्टात काय कार्यवाही झालेली आहे हे विभाग प्रमूखांना सूध्दा माहित नसते. आता यापूढे ज्या ज्या विभागाचे प्रकरण असेल त्या विभाग प्रमूखाची डायरेक्ट त्या पत्रावर सही करून माहिती पाठविली जईल. त्या त्या विभाग प्रमुखाला माहिती पाहिजे की प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर कोत्या स्टेजवर आहे. जबाब दाखल केला की नाही केला असेल तर तो बरोबर केला की नाही, याबाबतचे सर्व अधिकार संबधीत अधिकारी यांना देण्यात आलेले आहे. न्यायालयात किती प्रकरणे प्रलंबीत आहे या बाबत विधी सल्लागार माहिती देतील.

विधी सल्लागार : महानगरपालिकेच्या संदर्भाततील ५३०७ प्रकरण आहे. त्यापैकी मालमत्ता विभागाची १४६३ असून ६४१ प्रकरणात महापालिकेच्या बाजूने निकाल लागलेला असून ४४७ महापालिकेच्या विरोधात निकाल लागलेला आहे. ३४५ प्रकरणे प्रलंबीत आहे. या वर्षात २४ प्रकरणे नव्याने दाखल झालेली आहे.

सौ. लता दलाल : मालमत्ता विभागाच्या संदर्भात एवढे कमी प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत तर वसूली का होत नाही. त्या त्या वार्ड कार्यालयातील किती प्रकरणे प्रलंबीत आहे याचाही खूलासा घ्यावा.

मा.सभापती : मालमत्ता विभागाच्या संदर्भात किती प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहे या संबधीचा अहवाल विधी सल्लागार यांनी येणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत सादर करावा.सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना त्याच्या प्रति वितरीत करण्यात याव्यात.आताच आपण म्हटल्या प्रमाणे ज्या एका प्रकरणात जबाब सादर करावयाचा आहे तो त्वरीत सोमवारी कार्यरत असलेल्या पॅनलवरील वकीला मार्फत देण्यात यावा.

श्री. मुजेब खान : न्यायालयात ज्या त्या अधिकाऱ्यांनी वेळेवर माहिती दिली नाही तर त्यांना जबाबदार धरावे.

मा. सभापती : सर्व वार्ड अधिकारी यांना सूचना करण्यात येते की ज्या त्या वार्ड कार्यालय अंतर्गत मालमत्ता कराच्या संदर्भात न्याय प्रविष्ठ प्रकरण आहे. त्याची संपूर्ण यादी

सर्व सदस्यांना मिळेल यासाठी सचिवामार्फत देण्यात यावी. आता वार्ड अधिकारी अ यांनी कमी वसूली का झालेली आहे याचा सविस्तर खूलासा करावा.

वार्ड अधिकारी-अ : एकूण ३६ प्रकरणाच्या मालमत्तेच्या जप्ती करण्यात आलेली आहे. त्यामधे ११,५३,५७२ वसूल केलेले आहे. आणखी काही मालमत्ताच्या संदर्भात जप्तीची कार्यवाही चालू आहे. ठिकठिकाणी जवेवरच सुनावणी घेवून काही प्रकरणे निकाली काढत आहोत. १६ तारखेला हर्सूल येथे मंडप लावून सुनावणी घेण्यात येईल.

श्री. मिलींद दाभाडे : ज्या मालमत्तेच्या बाबतीत कोर्ट प्रकरण नाही व महानगरपालिकेये मोठे येणे आहे अशा मालमत्ता धारकांची यादी जहीर करावी व त्याचेकडून वसूली का केलेली नाही त्याची कारणे सभागृहात दयावी.

मा. सभापती : सुनावणी घेत असतांना काय कार्यवाही करावी लागते या बाबत उपआयुक्त यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : सुनावणीचा संबधीत व्यक्तीचा अर्जआल्यानंतर वार्ड अधिकारी सूनावणी घेतात मा. आयुक्त यांचेशी या संबधी संपूर्ण चर्चा झाली होती. संत एकनाथ रंग मदीर येथे काही प्रकरणात सुनावणी झाली बऱ्या पैकी यश आले आहे. किरकोळ स्वरूपाच्या सुनावणी घेण्याचे संपूर्ण अधिकार वार्ड अधिकारी यांना देण्यात आलेले आहे.

मा.सभापती : आता आजची सभा तहकूब करण्यात येते. पुन्हा सभा २.३० वाजता सूरू होईल याची संर्वाना नोंद घ्यावी. सर्वासाठी भोजनाची व्यवस्था केलेली आहे.

(दुपारी १.३० वाजता सभा तहकूब. पुन्हा दुपारी २.३० वाजता सभेला सुरूवात.)

मा. सभापती : आता वार्ड अधिकारी अ यांनी वसूली संदर्भात खूलासा केला परंतू समाधानकारक नाही. जे मोठे थकीत कर धारक असतील त्यांचेकडून तातडीने मालमत्ता कर असेल पाणीपट्टी असेल वसूल करावी. जे कूणी कर भरणा करीत नसतील त्यांचे मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना देण्यात येत आहे जेणे करून महापालिकेचे मोठया प्रमाणात उत्पन्न वाढेल. आता वार्ड अधिकारी-ब यांनी खूलासा करावा.

वार्ड अधिकारी-ब : एकूण मालमत्ता ६३० असून एकूण थकबाकी ६.७६ कोटीची होती. या वर्षीची डिमांड ३.७६ कोटीची होती. ३ कोटी थकबाकी आहे. काही लोकांकडे १९८२-८३ पासूनची थकबाकी आहे. मोठया थकबाकीदारांच्या संदर्भात वृत्तपत्रात दिले आहे. मूदतीत न भरल्यास जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मुजेब खान : अशा प्रकारची कार्यवाही किती वसूली झालेली आहे.

श्री. गजनन बारवाल : मोठे थकबाकीदार आहे त्यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे.

वार्ड अधिकारी-ब : मोठे थकबाकीदार यांचे कडून अशा प्रकारची कार्यवाही करून आतापर्यत ११ते १२ लक्ष वसूल केलेले आहे.काही प्रकरणात जप्तीची नोटीसा देवून पूढील कार्य वाही करीत आहोत.

श्री.गजनन बारवाल :काहीना नोटीसा न देताच जप्तीची कार्यवाही होत नाही हे बरोबर नाही. तसे अधिकार आयुक्तांनी वार्ड अधिकारी यांना दिले काय?

मा. सभापती : मालमत्ता कराच्या थकबाकी संदर्भात कर मुल्य निर्धारक व संकलक श्री. फड साहेब यांनी मोठया थकबाकीदाराची यांदी तयार करावी. १९९४ पासूनचे काही थकबाकीदार आहे. यादी तयार करून वृत्तपत्रात देवून पूढील कार्यवाही करावी.

जेसे गरीबाकडून सक्तीने वसूली केली जते त्याप्रमाणेच मोठे थकबाकीदार जे की व्यावसायकी असतील उदयोग पती असतील त्याचेकडून सक्तीने वसूली करावी .जे कुणी कर भरणा करीत नसतील त्याचे मालमत्तेचा जहीर लिलावाद्वारे ही कार्यवाही करता येईल. प्रशासनाची यंत्रना कूठेतरी कमी पडलेली दिसते. म्हणून वसूली झालेली नाही असे वाटते. दोन दिवसात पाठपरावा करून कार्यवाही करावी. पाणी पट्टीचे उद्‌दिष्ट पूर्ण केलेले आहे. सिडकोच्या नागरीकाचे सहकार्य मिळाले त्यांचे अभिनंदन करण्यात येते. त्यांनी महापालिकेच्या उत्पन्नात भर टाकलेली . व त्या भागात विकास कामे होण्यासाठी सभागृहाची सूध्दा भूमिका राहील. वार्ड अधिकारी क यांनी खूलासा करावा.

श्री. मुजीब खान : वार्ड अधिकारी क चे जगेवर राहत नाही. कर्मचारी जगेवर नसतात. त्या भागातील कामासाठी बैठक कधी घेतलेली आहे का?व कोणकोणती कामे करावयाची आहे या बाबत काही खूलासा महापालिकेच्या मूखय कार्यालयात आला का ?विकास कामे होण्यासाठी प्रत्येक महिण्याला बैठक होणे आवशक आहे बैठक झालेली नाही. सर्व कामे थप्प आहे. जेजेअंदाजपत्रक विकास कामाचे तयार झाले ते कुठे व कूणी मजूंर केलेले आहे. मला त्याची माहिती दिली नाही. या सर्व बाबीचा खूलासा करावा.

मा. सभापती : वार्ड अधिकारी क यांनी विकास कामाचे बजेट तयार केलेले आहे काय व त्यास मान्यता घेतलेली होती.

श्री. मुजीब खान : बजेट तयार केले होते का व त्यास सभागृहाची मान्यता घेतलेली होती काय याचा खूलासा वार्ड अधिकारी यांनी करावा.

मा.सभापती :आचार संहितेमूळे कामे होवू शकली नसतील.

श्री. मुजीब खान : आचार सहिंता एक दोन वार्डात होती. इतर वार्डात विकास काम` का झालेली नाही. दहा महिने झाले बैठक नाही. बजेट कसे तयार करून सादर केले. यास जबाबदार झोन अधिकारी की आणखी कूणी आहे याचा खूलासा करावा.

वॉर्ड अभियंता-ब : डिसेबर महिण्यात एक बैठक झालेली आहे.

श्री.मुजीब खान : बजेट कसे मंजूर केले. अनेक विकास कामे त्या बजेटमधे आलेले नाही. मागिल वर्षातील काही कामे तशीच आहे पूर्ण झालेली नाही. बैठक झाली नाही. बजेट कसे मंजूर केले.

मा.सभापती : वार्ड कार्यालय झालेले असून सहा सभापतीची निवडही केलेली आहे. सभापतीची निवड ही त्या वार्ड कार्यालय अंतर्गत येणाऱ्या स. सदस्य करीत असतात. ५ लक्षच्या कामाचे अंदाजपत्रकास मंजूरी देण्याचे सभापती यांना अधिकार दिलेले आहे व बैठक आयोजीत करण्याचे अधिकार दिलेले आहे. त्या अतंर्गत येणाऱ्या प्रभागाच्या विकास कामाच्या संदर्भात आढावा घेण्याचा अधिकार सभापतीना आहे. स. सूचविलेले काम त्या कामाच्या संदर्भात कार्यवाही केली नाही तर संबधीत अधिकाऱ्याच्या बाबतीत अहवाल देण्याचे अधिकार सूध्दा सभापती यांना आहे.या संदर्भात नियमावली तयार केलेली आहे. बजेट प्रोव्हीजन ही प्रत्येक वार्डसाठी केलेली होती. कोणकोणती कामे घेणे आवशक आहे त्याची यादी सभापती व वार्ड

अधिकारी यांनी सादर करणे आवशक होती त्या संबधी शिफारस करणे आवश्यक होते.

श्री. मुजीब खान : अनेक संचिका वार्ड कार्यालय-क मधे अलमारीत पडलेल्या होत्या नगरसेवक अधिकाऱ्याकडे संचिका मंजूर करण्याची मागणी करीत होते. सर्व संचिका आपण मागवून मा. आयुक्तांकडे मंजूरीसाठी दिल्या. कामे मंजूर केलेली नाही बैठक घेतली नाही या विरूध्द प्रशासन काय कार्यवाही करू शकते का याचा खूलासा विधी सल्लागार यांनी करावा.

मा.सभापती : वार्ड रचना नवीन झालेली आहे. काही दूरूस्त्या करावयाच्या असतील तर या सभागृहाला व सर्वसाधारण सभेला अधिकार आहे. नियमावली पास करून घ्यावी लागेल व त्यानूसार कार्यवाही करता येईल.

श्री. मुजीब खान : या संबधी तात्काळ कार्यवाही करावी. १० महिण्याचा कालावधी गेला कोणतेही विकास काम झाले नाही. वार्ड अधिकारी क यांनी खूलासा करावा.

वार्ड अधिकारी-क : मालमत्ता कराचे टारगेट ३.१९ कोटीचे होते.

सौ. लता दलाल : एकूण मालमत्ता किती आहे. थकबाकी किती ,चालू डिमांड किती व वसूली किती केलेली आहे याची माहिती संबधीत अधिकारी यांचेकडे नाही त्यांना १५ मिनिटाचा वेळ दयावा तोपर्यत वार्ड कार्यालय-ड ची माहिती घ्यावी.

वार्ड अधिकारी-ड : एकूण मालमत्ता १६९१९आहेत. एकूण डिमांड १०.३३ कोटी ,यात थकबाकी ७.०१ कोटीची असून चालू डिमांड ३.३२ कोटी आहे. १६ मार्च पर्यत एकूण वसूली ४.१७ कोटी वसूलीचे प्रमाण ४०.३७ टक्के आहे. थकबाकी रक्कम २.६९ कोटी वसूल केलेले आहे. ३१ मार्च पर्यत ५.५० कोटी पर्यत वसूलीहोईल. शासकीय थकबाकी ३० लक्षची आहे. ११.६७ लक्षचे धनादेश आलेले आहे. जवळपास ५.४० कोटी वसूली होईल.न्यायप्रविष्ठ प्रकरणे १८७ असून ४४ प्रकरणात दावे डिक्री झालेले आहे २६ प्रकरणात मी पाठपूरावा केला असून १२ लोकांनी पैसे भरणा केलेले असून ज्या प्रकरणात स्टे होता तेही प्रकरणाचे पैसे वसूल झालेले आहे. १६ लक्ष वसूल केले. उर्वरीत प्रकरण विधी विभागाकडे पाठविलेले असून अभिप्राय घेवून पूढील कार्यवाही होईल.

विधी सल्लागार : जी प्रकरणे अभिप्राय साठी आलेले होते त्यावर अभिप्राय देवून निकाली काढलेले आहे. काही प्रकरणाच्या बाबतीत नोटीसेस देवून प्रकरणे निकाली काढले आहे. एक १६ लक्षचे प्रकरण होते. १६ लक्ष रूपये कोर्टाकडून डिपॉजेट करून घेतलेले आहे कोर्टाचा निकाल आणखी होणार आहे. १६ लक्षचेच प्रकरण होते पूर्ण डिपॉजेट करून घेतले आहे.

मा.सभापती : वार्ड अधिकारी यांना सूचना की थोडे समाधान कारक काम आहे. यापेक्षाही कामाची गती वाढविण्याची आवशकता आहे. २६ प्रकरणाचा आढावा घेतला असता तर काहीना काही आणखी कार्यवाही झाली असती.

उपआयुक्त(प्र) : यापुर्वी झोन कार्यालय होते. त्याचे विभाजन करून वार्ड कार्यालय केलेले आहे. वार्ड अधिकारी यांना अधिकार दिलेले आहे. यापूर्वी कर आकारणी किंवा ॲसिसमेंटचे अधिकार झोन अधिकारी यांना नव्हते. काम अतिशय जलद गतीने होण्याच्या दृष्टीने ज्या त्या वार्ड कार्यालयात प्रकरणाची कार्यवाही होण्याच्या दृष्टीने

अधिकार प्रदान केलेले आहे.. वार्ड कार्यालयामार्फत वसूलीचे काम कार्यक्षमतेने चालू आहे. पहिलेच वर्ष होते दोन तीन वर्षात आणखी सूधारणा होईल. व १०० टक्के वसूली करण्या बाबत प्रयत्न होतील.

श्री. कवरसिंग बैनाडे : वसूली केली नाही तर महानगरपालिकेचा कारभार चालणार कसा. ज्या वार्ड कार्यालयाची वसूली चांगली झालेली आहे अशा अधिकाऱ्याचे कौतूक करून त्यांना एक वेतनवाढ देवून त्यांचा सन्मान करावा. समर्थनगर सारख्या भागात वसूल होत नसेल तर संबधीत अधिकारी काय काम करतात. प्रत्येक वेळेस सभागृहानेच निर्देश दिले पाहिजे काय? जे अधिकारी वसूली करीत नसतील त्यांचा ५० टक्के वेतन रोखावे.सिडको भागात मध्यमवर्गीय लोक राहतात. त्या भागातील झोनची वसूली मोठया प्रमाणात होते. परंतू इतर वार्ड कार्यालयाची वसूली म्हणावी तशी झालेली नाही. यास दोषी कोण आहे. वार्ड कार्यालय निहाय मालमत्ताची यांदी करून मालमत्ता कर भरण्यासाठी मुख्य कार्यालयात सूध्दा सुविधा करून द्यावी.

श्री.साहेबराव कावडे : अभ्यासवर्ग घेण्यात यावे. त्यांची काम करण्याची क्षमता नाही. सिडकोचे मध्यमवर्गीय रहिवाशी यांचेकडून वसूली होते.

श्री.रेणुकादास वैद्य : नागरीक पैसे भरायला जतात. अ, ब, क, ड प्रमाणे यादी करावी. संगणकावर घ्यावी व स्वतंत्र कक्ष करावे.

मा. सभापती : स.सदस्यांनी सूचना केलेली आहे त्याची प्रशासनाने दखल ध्यावी.संगणकीकरणाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर येणारच आहे. त्यास आपण मंजूरी देवू.

श्री. रेणूकादास वैद्य :महानगरपालिकेच्या कराचा भरणा कोणत्याही प्रभाग कार्यालयात करता यावा.जे अधिकारी चांगली वसूली करेल त्यांचा सत्कार, अभिनंदन केले पाहिजे. जे रेग्यूलर किमान तीन वर्ष कर भरणा करीत असतील त्यांना काहीना काही सूट मिळावी. जेणे करून वसूलीमधे वाढ होईल.

श्री. मुजीब खान : वार्ड कार्यालय क मधे काही नागरीकांनी कराचे पैसे भरणा केलेले होते व त्या रजिस्टरचे पाने फाडलेली होती. ते रजिस्टर यासभागृहात आणाणार होते ते आणलेले आहे काय याचा खूलासा ध्यावा. ऑडीट झाले. चौकशी केली. किती रक्कमेचा अपहार झालेला आहे. एका व्यक्तीने ५०,५०० रूपये करापोटी भरणा केलेले आहे. महापालिकेच्या रेकार्डला ५०० रूपयाची नोंद आहे. या संदर्भात सभागृहात चर्चा झाली त्यानंतर संबधीत विभागामधे काही कर्मचारी यांनी त्या रजिस्टरचे पानेच फाडलेली आहे असे दिसून आले.जे चौकशी केलेली आहे ती सभागृहासमोर ठेवावी.लाखो रूपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे.

(याच वेळी वार्ड अधिकारी-क चे यांनी रजिस्टर सभागृहात आणलेले होते व त्या रजिस्टर मधील पाने फाटलेले असल्याचे सभागृहात दाखविण्यात आले. )

श्री. शशांक विसपूते : हे प्रकरण अत्यंत गभीर असून याची दखल घेण्यात यावी.

मा. सभापती : रजिस्टर मधील दोन पाने फाटलेली आहे असे दिसून आले. ज्यांनी पाने फाडलेली आहे त्या संबधीत जे असतील त्याचेवर कार्यवाही प्रस्तूत केलेली आहे. त्या कार्यवाही बाबतचा सविस्तर खूलासा देण्यात यावा.

वार्ड अधिकारी-क : वार्ड कार्यालय क मध्ये रेणंटीपुरा भागातील रजिस्टर क्र १० मध्ये पान क्र १७१ ते १७४ पर्यंतचे दोन पाने फाटलेले आहे. जे कर निरीक्षक होते त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. त्यांनी खूलासा केलेला आहे. मालमत्ता कराचे रजिस्टर वसूली करणारे कडून हाताळले जतात.

श्री.मुजेब खान : कर निरीक्षकां व्यतिरिक्त आणखी कर्मचारी वसूली करतात. एकाच कर्मचाऱ्यास दोषी ठरविणे योग्य नाही. पूर्ण ग्रुपचे नाव सांगावे.चौकशी झाली त्यात सर्वांचे नाव आलेले आहे. ते वाचून दाखवावे.

वार्ड अधिकारी-क : इतर जे कर्मचारी आहे ते शिपाई आहे. वसूली करीत नव्हते. वसूली करणारे कर्मचारी यांचे हातून रजिस्टर हाताळले जते नोटीस दिली असता असे उत्तर आले की रजिस्टरची दोन पाने फाडली जतात व काही जिर्ण झालेली पाने गहाळ होतात. किंवा निसटलेली पाने रजिस्टरमधे व्यवस्थीत ठेवली जत नाही. तसेच दर वर्षी रजिस्टरची बुक बॉडींग होत असते त्यावेळी गहाळ झालेली निसटलेली पाने व्यवस्थित लावली जते परंतू एखादया वेळेस पाने लावणे किंवा फाडले जवू शकतात परंतू माझेकडून रजिस्टर क्र १० मधील पाने खाडाखोड किंवा फाडण्यात आलेली नाही असे नोटीसचे उत्तर आलेले आहे. मी माझ्या कामात निषकाळजेपणा केला नाही तरी माझी कारणे दाखवा नोटीस रद्य करावी असे ७.२.२००६ ला उत्तर आलेले आहे. आता पूढील कार्यवाही साठी उपआयुक्त महसूल यांचेकडे पाठविण्यात येईल.

मा.सभापती : भ्रष्टाचाराचा आरोप केलेला आह. मागणी रजिस्टर मधील पाने फाटलेली असतांना संबधीतास आतापर्यत फक्त कारणे दाखवा नोटीसच दिलेली आहे. या प्रकरणात प्रशासन दिरंगाई करीत आहे.

श्री. मुजेब खान : ज्यानी रक्कम भरणा केली त्यांचेकडील पावती व महानगरपालिकेकडे असलेली पावती तपासणी केली तर किती रक्कमेचा भ्रष्टाचार झाला हे उघडकीस येईल. याची कार्यवाही पोलीस विभागाकडे दिली पाहिजे

श्री. गजनन बारवाल : सर्व काही माहिती असतांना दोषी व्यक्तीवर अद्याप कार्यवाही केली नाही. त्यांना नोटीस दिली. पून्हा पून्हा तीच ती चर्चा होत आहे. जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.शंशाक विसपूते : जेदोषी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी जेचौकशी करीत आहे तेच विलंब करीत आहे असे वाटते. संबधीत पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे.

सौ. लता दलाल : स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी एका प्रकरणाची माहिती सभागृहासमोर आणलेली आहे. परंतू या निमित्ताने कोणताही विभाग जेथे जेथे आर्थिक व्यवहार येतो अशा अनेक संचिका रेकॉर्ड विभागातून गायब आहे. त्याचाच एक लहानसा नमूना आपल्या समोर आलेला आहे. वसूली होत नाही म्हणून आम्ही सभागृहात नेहमीच प्रशासनास धारेवर धरतो. वसूली झाली नाही तर विकास कामे होत नाही आजही अनेक कामे स्पील ओव्हरमधे आलेली आहे. आज या प्रकरणात दोनच पाने फाटलेली बाब समोर आलेली आहे. अनेक पाने फाटलेली असतील. अनेक अधिकारी कर्मचारी दोषी असतील.रजिस्टरची पाने फाटलेली आहे याचा पूरावा सभागृहासमोर आलेला आहे चौकशीची गरज नाही संबधीतावर कडक कार्यवाही

करावी. यात आणखी कुणी दोषी असतील तर त्यांचेवर सुध्दा कडक कार्यवाही करण्यात यावी.

श्री. मुजेब खान : हे काम एका व्यक्तीचे नाही. कायद्याने या दोषीवर कार्यवाही व्हावी. कोणी किती व केंव्हा अशा प्रकारच्या रक्कमा गिळकृत केल्या व किती पाने आजपर्यंत फाडलेली आहे याची चौकशी होण्यासाठी पोलीस विभागाकडे दिले जवे अशी विनंती आहे.

श्री. नासेर नाहदी : सभागृहात रजिस्टर सादर केले त्यात पाने फाटलेली आहे. ते उघडकीस आलेले आहे. संबधीतावर कडक कार्यवाही करावी. चौकशी करू नये. तसेच स. सदस्यांनी गेल्या १० महिन्यात स.सदस्यांनी जे जे घोटाळे समोर आणले त्याची नुसती चौकशीच चालू आहे. काहीच कार्यवाही होत नाही.

मा.सभापती : आताच अधिकारी यांनी खूलासा केला की मागणी रजिस्टरमधील पान क्र १७१ ते १७४ फाटलेले दिसून आले. असे प्रकार इतर विभागातही चालत असावेत अशी शंका घेण्या इतपत पूरावा समोर आलेला आहे. तातडीने कार्यवाही का करण्यात आली नाही ही बाब स्थायी समितीच्या समोर आलेली नाही. सभागृहाच्या भावना लक्षात घेता नैसर्गिक न्याय तत्वाप्रमाणे वार्ड अधिकारी व संबधीत जेकर निरीक्षक यांना उपआयुक्त महसूल यांनी प्रत्यक्ष त्यांचे दालनात बोलवून चौकशी करावी. उद्या न्यायालयात गेले तर सभागृहावर काही येऊ नये. की गुन्हा घडलेला समोर आल्यावर कार्यवाही केली नाही.

वार्ड अधिकारी-क : एकूण मालमत्ता ७५१३, थंकबाकी २.६५ कोटी, चालू मागणी ७२ लक्ष एकूण ३.१९ कोटी उद्दीष्ट आहे. वसूली १.२२ कोटी झालेली आहे. न्याय प्रविष्ठ प्रकरणे १० असून २४ लक्षची थकबाकी आहे.

श्री.मुजेब खान : बर्फ कारखाना आहे. संबधीत मालकावर काल पासून काय कार्यवाही केलेली आहे.संबधीत मालक मालमत्ता विक्री करण्याच्या तयारीत आहे ते थांबविण्यासाठी काय कार्यवाही केलेली आहे.

वार्ड अधिकारी-क : चार दुकानाचा कर थकलेला आहे त्यास सिल लावले जणार असून एका दूकानाचा कर भरणा केलेला आहे.संबधीत मालकानी मालमत्ता विक्री करू नये म्हणून रजिष्ट्री कार्यालयास पत्र दिले की महानगरपालिकेचा कर भरणा केल्या शिवाय रजिष्ट्री करू नये.

श्री. मुजेब खान : जे दूकानदार आहे त्यांनी भाड्याने दुकान घेतलेले आहे. सदर मालमत्तेचा कर थकीत आहे म्हणून तसे वृत्त पत्रात जहीर करावे जनतेला माहिती होईल व खरेदी करणारे करणार नाही. जे भाडे करू आहे त्याचे असे म्हणणे आहे की आम्ही जेंव्हा पासून दूकान घेतले आहे तेंव्हा पासूनचा कर भरण्यास तयार आहे. दुकानास सिल करून भाडेकरूच्या पोटावर मारत आहात. मालकांना सूट देत आहात. हे बरोबर नाही. सदर मालमत्ता सिल करून जप्तीची कार्यवाही करावी.किरायादार त्याचे कडे असलेल्या दुकानचा कर भरण्यास तयार आहे तो भरणा करून घ्यावा.उर्वरीत मालकाकडून वसूल करावे.

वार्ड अधिकारी-क : दुकान मालकाच्या नावावर आहे. ज्यांचेकडे दुकान आहे त्यांचेकडून ते किराया घेतात. दुकानचे ५४ हजर कर बाकी आहे. संबधीत मालकाने मालमत्ता विक्री करू नये म्हणून वृत्तपत्रात तसे दिले जईल.

मा. सभापती : वार्ड अधिकारी इ यांनी वसूलीच्या संदर्भात खूलासा करावा.

वार्ड अधिकारी -इ : एकूण मालमत्ता १०८५८, डिमांड आहे ३.५६ कोटी थकबाकी, चालू मागणी १.१९ कोटी असे एकूण डिमांड ४.७५ कोटीची मागणी आहे. एकूण २.५० कोटीचे उद्‌दिष्ट देण्यात आलेले आहे. ९५.५२ लक्ष आतापर्यतची वसूली झालेली आहे.

श्री. कवरसिंग बैनाडे : ४.७५ कोटी एकूण येणे आहे. २.५० कोटीचे उद्‌दिष्ट दिले वसूली फक्त ९५ लक्षच झाली हे योग्य वाटत नाही.

श्री. मुजेब खान : वसूलीसाठी किती कर्मचारी आहेत याचा खूलासा करावा.

वार्ड अधिकारी-इ : वसूलीसाठी तीन कर निरीक्षक आहे. त्यांचे बरोबर चार चार वर्ग ४ चे कर्मचारी दिलेले आहे. दोन दोन कर्मचाऱ्याच्या पथक तयार केलेले आहे. सहा पथके काम करतात. जे एरिया आहे तो चिकलठाणा संजयनगर, मुकूंदवाडी प्रकाशनगर, म्हाडा कॉलनी, संघर्षनगर, राजीवगांधी नगर, वार्ड-इ अंतर्गत ८०% भाग हा स्लम व गुठेंवारीचा येतो. आतापर्यत कुणालाही डिमांड बिल दिलेले नव्हते आता डिमांड दिलेली असून पाच ते सहा वर्षापासूनची बाकी आहे हे नागरीक एकदम संपुर्ण रक्कम भरण्यास पूढे येत नाही.अर्धे पेमेन्ट करीत आहे. नतंर नोटीस देवून ही वसूली करणे चालू आहे. वसूलीचे काम यापूढेही चालूच राहणार आहे. आणखी २० लक्ष वसूल होतील.या वार्ड अतंर्गत कमर्शियल व मोठया इमारती फारच कमी आहे. ५० हजरच्या डिमांडवरचे कूणीही नाही. त्यांचेकडूनही पार्ट पेमेन्ट वसूल केलेले आहे.

श्री. मुजेब खान : स्लम भाग व जे गुठेवारीचा भाग आहे तेथील नागरीकांकडून जबरदस्तीने वसूली करून ९५ लक्ष वसूल केले मोठमोठे खातेदार आहे त्यांचेकडे तशीच बाकी आहे वसूल केलेले नाही. त्याचेकडून पार्ट पेमेन्ट घेवून येतात हे बरोबर नाही. पूर्ण वसूली करावी तसे सूचना कराव्यात.

सौ. लता दलाल : ९५ लक्ष वसूली अशी वसूली होत असेल तर विकास कामे होणार नाही. वार्ड ई अंतर्गत मोठमोठया हॉटेल आहेत. मोठमोठया कमर्शियल इमारती मुख्य रस्त्यावर आहे अशा लोकांकडून पार्ट पेमेंन्ट घेत असेल तर योग्य नाही. टारगेट पूर्ण होत नाही तर पार्ट पेमेन्ट कशासाठी घेता. १९ टक्के वसूली झालेली आहे. वसूली होत नसेल तर वार्ड कार्यालयातील सर्वच कर्मचाऱ्याचे पगार थांबविण्यात यावे.

वार्ड अधिकारी-इ : जनेवारीपासून मी चार्ज घेतलेला असून जे तीन कर निरीक्षक वसूलीसाठी दिलेले आहे ते अकार्यक्षम आहे.अप्रशिक्षित आहे.त्याचे एक पगार रोखण्यासाठी सूध्दा शिफारस केलेली असून मा.आयुक्तांनी त्यास मान्यता दिली आहे.

श्री. कवरसिंग बैनाडे : कार्यक्षम कर्मचारी दिले असते तर नक्कीच वसूली झाली असते याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरजआहे. अधिकारी सत्य परीस्थिती सांगत आहे.

मा.सभापती : कर निरीक्षक म्हणून नियूक्ती आहे की दुसरे पद असतांना वसूलीचे काम दिलेले होते.

वार्ड अधिकारी ई :नुकतेच तीनही कर्मचाऱ्याचे प्रमोशन झालेले होते. वरीष्ठ लिपीक आहे. त्यांना वसूलीचे काम दिले होते. परंतू ते अकार्यक्षक आहे. म्हणून शिफारस केली होती.

मा.सभापती : बदल्या करतांना प्रशासनाने योग्य ते कर्मचारी दिलेले नाही अशी आपली धारणा आहे काय? बदल्या करायच्या म्हणून केल्या काय?

वार्ड अधिकारी-इ : मा.आयुक्त यांचे निदर्शनास ही बाब आणून दिलेली आहे.

मा. सभापती : वॉर्ड अधिकारी-फ यांनी वसूली संदर्भात खुलासा करावा.

वॉर्ड अधिकारी-फ : एकूण मालमत्ता २३०३९, डिमांड ९.२१ कोटी, थकबाकी ६.५७ कोटी, चालू मागणी २.६४ कोटी. कालपर्यंतची वसुली ३.३९ कोटी, वसुलीचे प्रमाण ३७% येते. ३१ मार्च पर्यंत १ ते १.५ कोटी वसूली होईल अशी अपेक्षा आहे.

श्री.मुजीब खान : वॉर्ड कार्यालय-फ मध्ये कोणता एरिया येतो त्याचा खुलासा द्यावा.

वॉर्ड अधिकारी-फ : वॉर्ड कार्यालय फ मध्ये सुराणानगर, विष्णूनगर, भानुदासनगर, न्यु शांतीनिकेतन कॉलनी, जवाहर कॉलनी, जय विश्वभारती कॉलनी, टिळकनगर, गारखेडा, इंदिरानगर, ज्योतीनगर इत्यादी.

श्री.मुजीब खान : या वॉर्ड कार्यालया अंतर्गत मोठमोठ्या हॉटेल्स इमारती असून व्यावसायिक वापर होतो. कमर्शियल एरिया जास्त असताना ९ कोटीपैकी ३ कोटी वसूल केले. या भागात वसुली कर्मचारी गेले तर वसूली केल्याशिवाय परत येणार नाही. कर भरणा करणारे नागरीक आहेत. मोठमोठे बिअरबार आहेत. वसूली कमी का झाली?

सौ.लता दलाल : न्यायप्रविष्ट प्रकरणे किती आहेत?

श्री.नासेर नाहदी : दरक पेट्रोल पंप मालकाकडे किती थकबाकी आहे?

वॉर्ड अधिकारी-फ : फील कोड इंजिनिअरींग म्हणून त्यांचेकडे थकबाकी आहे. ८.७६ लक्ष इतकी थकबाकी आहे. याबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असून कोर्टाची स्थगिती आहे. आता तेथे दरक नावाने पेट्रोल पंप झालेला आहे.

श्री.नासेर नाहदी : मोठमोठ्या थकबाकीदाराकडून वसूली केली जात नाही. त्यांना कोर्टात जाण्याचा सल्ला व वेळ दिला जातो. अशा मालमत्ता सिल का केले जात नाही. गरीब लोकांकडून सक्तीने वसूली होत आहे. हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. कुणावरही अन्याय होणार नाही व सवलत दिली जाणार नाही याची दखल घेवून वसूली करावी. संबंधीतास एक नोटीस दिली त्यांनी कोर्टातून स्थगिती आदेश आणले.

सौ. लता दलाल : फीलकोड इंजिनिअरींग होते आता त्याच जागेवर पेट्रोल पंप झाला. त्यासाठी मनपाची एन.ओ.सी. घेणे आवश्यक आहे. बांधकाम परवानगी घ्यावी लागते. संबंधीत मालकाकडील थकबाकीची तपासणी न करता NOC दिली कशी, याची चौकशी व्हावी.

वॉर्ड अधिकारी-फ : सदर मलामत्ता फिलकोड इंजिनिअरींग या नावाने आहे. थकबाकीसाठी नोटीस दिली व नोटीसची मुदतीच्या आत कोर्टात प्रकरण दाखल केले व कोर्टाचा या प्रकरणात स्थगिती आदेश आहे. सध्या तेथे पेट्रोल पंप आहे.

सौ. लता दलाल : एवढी मोठी थकबाकी असताना मनपाने NOC दिली कशी, सामान्य नागरीक एक खोली बांधायची असेल तर परवानगीसाठी दहा वेळा चकरा मारतात. NOC देताना थकबाकी आहे की नाही याची तपासणी का केली नाही?

श्री.मिलींद दाभाडे : एखाद्या घरात नळ कनेक्शन घ्यायचे असेल तर संपूर्ण मालमत्ता कर भरणा करून घेतला जातो. एवढी मोठी थकबाकी असताना NOC दिली कशी, याचा खुलासा करावा.

वॉर्ड अधिकारी-फ : NOC वॉर्ड कार्यालयाकडून दिली नाही.

मा. सभापती : मागणी रजिष्टरला जी थकबाकीची रक्कम संबंधीत मालकाकडे होती ते का वसुल करण्यात आले नाही. सदर एजन्सीचे शहरात किती पेट्रोल पंप आहेत?

वॉर्ड अधिकारी-फ : संबंधीतास नोटीस दिली होती. जप्तीची नोटीसची मुदत संपण्या अगोदर त्यांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले, मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिले.

उप आयुक्त (म) : मालमत्ता कर हा मालमत्तेवर असतो तो व्यक्तीवर नसतो. फिलकोड इंजिनिअरींगच्या नावावर मालमत्ता कर होता. त्यानंतर ही मालमत्ता दरक एजन्सीला विक्री केलेली आहे आणि मधल्या काळात त्यांनी NOC घेतलेली आहे. वसुली करीत असतांना वॉर्ड अधिकारी यांनी नमुना 'ह' आणि 'अ' नोटीस देत असताना दरम्यानच्या काळात संबंधीतानी स्थगिती आदेश आणलेले आहे. जर NOC मनपाला अंधारात ठेवून घेतली असेल तर ती रद्द करण्याची कार्यवाही केली जाईल.

श्री.मुजीब खान : प्रशासन अंधारात कसे राहते, कधी संपणार हा अंधार हे कळत नाही.

मा. सभापती : एक, दोन वॉर्ड वगळता इतर वॉर्डांची वसूली करण्यात नकारात्मक भूमिका दिसून येते. मालमत्ता व पाणीपट्टीची वसूली ज्याप्रमाणे होणे गरजेचे होते त्याप्रमाणे झालेली नाही. आताच अधिकाऱ्यांनी वसुलीच्या संदर्भात खुलासा केला तेव्हा कुठल्याही लोकप्रतिनिधींनी वसुली करू नये म्हणून दबाव आणलेला नाही. वसुलीत वाढ झाली पाहीजे, म्हणून जो कर भरतो त्यांचेवर कराचा बोजा वाढवून वसूली करणे योग्य नाही. तर १००% जो कर आहे तो वसूल केल्यास सर्वांना सारखा न्याय मिळेल. ही जबाबदारी प्रशासनाची आहे. जकात विभागातून आलेल्या १४० कर्मचाऱ्यांपैकी जे योग्य आहेत ते मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूलीसाठी द्यावे. बदल्या करताना मनमानी होऊ नये. सक्षम कर्मचारी द्यावेत. १५०० कर्मचारी बदल्या व वॉर्ड कार्यालयाची पुनर्रचना करून ज्या पध्दतीने कामे होणे गरजेचे होते ती झाली नाही. मालमत्ता कर व पाणीपट्टीची ९०% वसूली करावी. ही जबाबदारी प्रशासनावर देण्यात येते. जे चांगली वसुली करणार नाही त्यांचेवर कारवाई होईल. चांगली वसूली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्याचा विचार केला जाईल. ज्या नागरीकांनी सलग ३ वर्षे १००% कर भरणा केला असेल त्यांना १०% करात सूट देण्यात येते. ज्यांचेकडे थकबाकी राहील त्यांचेकडून व्याजासह वसूल करावे. मालमत्ता कराचे उद्दीष्ट ३२ कोटीचे दिले आहे, ४७ कोटी थकबाकी आहे. ९०% वसूली प्रशासनाने करावी. ४१.५० कोटीचे उद्दीष्ट देण्यात येत आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : ४५ कोटीच वसूल करावे. स्पेकने सर्व्हे केला, मालमत्ता ४७ हजार वाढ झाली. ४५ कोटीचे उद्दीष्ट ठेवावे.

श्री. मुजीब खान : ५० हजार जास्त मालमत्ता आढळून आल्या. पुर्वीच्या घरांचा त्यात समावेश आहे काय? यापुर्वीची घरे किती होती त्याचे खरेदीखत आहे का? नवीन व जुन्या घराचे मिळून नवीन ५० हजार मालमत्ता दाखवीत आहे. मनपाकडे रेकॉर्ड नाही त्यामुळे ३० ते ४० हजार घरांना डबल कर भरण्याबाबत नोटीसा दिलेल्या आहेत. संबंधीत नागरीक आले तर सुनावणी

घेऊन कार्यवाही करू असे मा.आयुक्त यांनी सुध्दा मागील बैठकीत म्हटले होते. जुन्या मालमत्तेचा रेकॉर्ड नाही. ५० हजार नवीन आहे असे म्हटले त्यास आम्ही सहमत नाही. सदर एजन्सीला सर्व्हेचे पैसे फुकट दिले जातात. वॉर्ड-क ची जी घरांची संख्या दिली ती कशाच्या बेसवर दिली?

वॉर्ड अधिकारी-क : मालमत्ता रजिष्टरनुसार ती संख्या आहे. त्यांनी नवीन कोणतेही घर आकारणी करून दिलेले नाही.

श्री.मुजीब खान : स्पेक या कंपनीने सर्व्हेचे जे काम केले ते पुर्वीचे रजिष्टर नुसारच केले. नवीन घर नाही याचा खुलासा करावा. सर्व्हेसाठी जो खर्च दिला जात आहे तो मनपाला भुर्दंड आहे.

मा. सभापती : करमुल्य निर्धारक व संकलक यांनी खुलासा करावा. मालमत्तांचे सर्व्हेक्षण झाल्यानंतर किती उत्पन्न वाढणार आहे?

करमुल्य निर्धा. व संकलक : स्पेकच्या सर्व्हेच्या माध्यमातून १.४४ लक्ष मालमता निदर्शनास आलेल्या आहेत. मनपाच्या रेकॉर्डवर पुर्वी ९८ हजार मालमत्तांचीच नोद होती. चौकशी केली असता ६२ हजार मालमत्ता ह्या जास्तीच्या असून सर्व्हे केला असता ४२ हजार मालमत्ता लिंक झालेल्या आहेत. त्यांना अद्याप नोटीसेस दिल्या नाही. सुनावणीची नोटीस देणार आहोत. १ लक्ष मालमत्तांपैकी ४८ हजार मालमत्तांना सुनावणीची नोटीस दिलेली आहे. या महिना अखेर पूर्ण १ लक्ष मालमत्तांना नोटीस देण्याचे काम पूर्ण होईल.

मा. सभापती : सर्व्हे केल्यानंतर किती मालमत्ता वाढल्या त्याची मागणी रजिष्टरला नोद घेतली आहे का, हा स.सदस्यांचा प्रश्न आहे व उत्पन्नात किती वाढ होईल?

करमुल्य निर्धा. व संकलक : मागणी रजिष्टरला नोंद घेण्यासाठी मालमत्ता धारकांना सुनावणी देण्याचे काम चालू आहे. हे काम एप्रिल पर्यंत चालेल. सर्व रजिष्टरची संगणकाद्वारे नोंद होईल व वॉर्ड कार्यालयात दिले जातील.

श्री.मुजीब खान :सर्वच नागरीकांना नोटीसा दिल्या. जे रेग्युलर कर भरतात त्यांना त्रास देण्याचे काम स्पेक या संस्थेमार्फत होत आहे. मनपातील अधिकारी सर्व्हेचे काम करू शकले असते.

करमुल्य निर्धा. व संकलक : स्पेकमार्फत जो सर्व्हे होईल तो पूर्ण इंटरनेटवर, वेबसाईटवर येईल. घराचे जे नकाशे त्यांनी तयार केले आहेत ते ॲटोकार्ड मध्ये तो नागरीक किती कर आहे हे पाहू शकतो. मालमत्तेस कर बरोबर लागला की नाही हे मनपाच्या अधिकारी किंवा व्यावसायिक बघू शकेल.

श्री. मुजीब खान : सदर एजन्सीकडे टेक्नीकल कर्मचारी होते का? १०वी, १२वी पास मुलांकडून सर्व्हेचे काम करून घेण्यात आले. घराची संपूर्ण माहिती घेऊन कर लावलेला नाही. एकूण खर्च किती आलेला आहे?

करमुल्य निर्धा. व संकलक : टेक्नीकल ३०० कर्मचारी होते. एका टीममध्ये चार लोक होते. त्यात इतर हेल्पर कर्मचारी म्हणून होते. आणखी सर्व्हेचे काम चालू आहे. २.२५ कोटीचा खर्च होत आहे.

श्री. मुजीब खान : २.२५ कोटी सर्व्हेसाठी खर्च व वॉर्ड कार्यालयाची वसूली ही ९४ लक्ष, ९५ लक्ष होत आहे हे योग्य नाही.

करमुल्य निर्धा. व संकलक : कोर्टामध्ये मनपाच्या विरोधात ज्या प्रकरणात निकाल लागले त्याचे कारण असे की असेसमेंट रजिष्टर तयार नसणे, रिव्हीजन बुक तयार न करणे याच आधारे निकाल लागलेले आहेत. आता संगणकीकरण झाल्यानंतर असे प्रकार भविष्यात होणार नाहीत.

श्री. मुजीब खान : ज्या प्रकरणात मनपाच्या विरोधात निकाल दिला त्या संदर्भात मनपाने अपील केलेले आहे का?

श्री.नासेर नाहदी : मालमत्ता कराच्या संदर्भात दररोज किती करणांची सुनावणी होते.

करमुल्य निर्धा. व संकलक : स्पेक मार्फत वॉर्ड अभियंता यांना सुनावणीसाठी अधिकार दिलेले आहेत. प्रत्येक दिवशी वॉर्ड कार्यालयात सुनावणी चालू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : यावर्षीच्या पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीसाठी किती तरतुद करण्यात आली आहे?

श्री.कंवरसिंग बैनाडे : हॉटेल लायसन्स तपासणीसाठी एका एजन्सीला मोठी रक्कम देण्यात आली. एवढा खर्च करूनही मालमत्ता करात वाढ का होत नाही.

मा. सभापती : उप आयुक्त (म) यांनी खुलासा करावा. कार्यक्षमतेने काम का होऊ शकले नाही?

उप आयुक्त (म) : मागील वर्षी पाणीपट्टी व मालमत्ता कर वसूलीसाठी अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. झोन कार्यालयाऐवजी वॉर्ड कार्यालय केले व वसुलीसाठी प्रत्येक वॉर्ड कार्यालयामध्ये ५-६ कर्मचारी होते. आता १०-१२ वर्ग ३ चे कर्मचारी व तेवढेच वर्ग-४ चे कर्मचारी प्रत्येक वॉर्ड कार्यालयात वसुलीसाठी देण्यात आलेले आहेत. १५ मार्च पर्यंत २५-२६ कोटी पाणीपट्टी व मालमत्ता कर वसूल केलेला आहे. वसूली न होण्याचे कारण रेकॉर्ड व्यवस्थित नसणे. रेकॉर्ड व्यवस्थित करण्याचे काम एक वर्षापासून चालू आहे. वसुलीसाठी जी डिमांड आहे त्यानुसार काही मालमत्तांच्या डबल नोंदी झाल्यामुळे १७ कोटीची डिमांड कमी झालेली आहे. उर्वरीत डिमांड ही ६० कोटी असून २५ कोटी वसूली केलेली आहे. १३-१४ दिवसात ३७-३८ कोटीपर्यंत निश्चित वसूली होईल. सर्व त्रृटी दूर करून स्थायी समिती जे काही उद्दीष्ट देईल ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

मा. सभापती : पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीसाठी किती तरतूद आहे, संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि.(पा.पु.) : पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीसाठी १.९३ कोटी, पाणी पुरवठा-२ ५८.८५ लक्ष, पाणी पुरवठा स्थापत्य जायकवाडी १.३९ कोटी, पाणी पुरवठा शहर मशिनरी १.०१ कोटी, पाणी पुरवठा यांत्रिकी जायकवाडी २.४२ कोटी एकूण स्पील ओव्हरची कामे ७०.६१ लक्ष एकूण ६.३४ कोटी तरतुद आहे.

श्री. विनायक पांडे : यातून २ कोटीची तरतूद कमी करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : सिध्दार्थ उद्यानाचा स्तर उंचावण्यासाठी १ कोटीची तरतूद आहे. बीओटी वर देण्याचा ठराव आलेला आहे. म्हणून ही १ कोटीची तरतूद विकास कामावर खर्च करावी.

श्री. मुजीब खान : अनेक सदस्यांच्या वॉर्डातील कामे यात आलेली नाहीत. त्यांचा समावेश करण्यात यावा व इतर लेखाशिर्षामधील तरतूद कमी करावी. तसेच ज्या ठळक बाबी आहेत त्यावर चर्चा करून या अर्थसंकल्पास मंजुरी द्यावी. मा.सभापती यांना अधिकार देण्यात यावेत. योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.रेणुकादास वेद्य : प्राणी संग्रहालयास आधुनिकीकरण करण्यासाठी १ कोटीची तरतूद असून ती तूर्तास स्थगित करून विकास कामासाठी वापरण्यात यावी.

श्री.कंवरसिंग बैनाडे : अर्थसंकल्पात अनावश्यक जास्तीची तरतूद केलेली दिसून येईल. पाण्याचे गांभीर्य सर्वांना ठाऊक आहे. १८०० ऐवजी २९००/- पाणी पट्टी करावी म्हणून नमूद केले. सर्वांचे मत असेल तर १८०० ऐवजी २००० पाणीपट्टी करावी. प्रशासकीय खर्च मोठा दाखवला परंतु जे दैनिक वेतनावरील कर्मचारी आहेत त्यांच्या विम्याचा खर्च यात दाखवला नाही. काही दुर्घटना

घडल्यास त्याचा खर्च कोण करणार आहे. शासनाची योजना आहे, विमा काढणे गरजेचे आहे. यात तरतूद करावी. कमर्शियल नळ कनेक्शनसाठी वाढवावे, अनधिकृत नळ कनेक्शन शोधावे.

श्री.रेणुकादास वैद्य : बजेटवर सर्व सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या. प्रशासकीय खर्च वाढलेला असून एवढया चांगल्या योजना असताना प्रशासकीय खर्च कमी होत नाही. व्हीआरएस सारखी योजना मनपात राबवावी. व्हीआरएस ज्यांना देण्यात येईल त्यांचे पाल्यांना पुन्हा मागच्या दाराने घेऊ नये म्हणजे प्रशासकीय खर्च कमी होईल. जमा बाजूचा लेखा-जोखा घेतला. वसुलीत समाधानी नाहीत. उद्दीष्ट वाढले पाहिजे. जो खर्च दाखविलेला आहे यात सर्व सदस्य समाधानी नाही. प्रत्येकाच्या वॉर्डातील कामे आली नसतील तर त्यांचा समावेश करण्याचे अधिकार मा.सभापतींना द्यावेत व हा अर्थसंकल्प मंजूर करावा.

श्री. विनायक पांडे : जी सुचना श्री.राजू वैद्य यांनी माडली त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.साहेबराव कावडे : जेथे घर तेथे नळ कनेक्शन असावे. जेणे करून पाणीपट्टी वाढविण्याची गरज पडणार नाही. तसेच पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्याची गरज आहे. पाणीपट्टीत वाढ करू नये.

श्री.शशांक विसपुते : गुंठेवारीत सर्व्हेचे काम चालू असून पाहिली नाटीस दिली, दुसरी नोटीस देण्यास एजन्सीकडूनच दिरंगाई होत आहे. यात असे नमूद केले की, नागरीकांकडून पैसे भरण्यास उशीर झाल्यास १०% दंडात्मक रक्कम आकारण्यात येईल, ती रद्द करण्यात यावी.

श्री.मुजीब खान : सर्व्हेसाठी २ कोटी खर्च केले. संबंधीत एजन्सीने गावठाण भागात जो भाग गुंठेवारीत येत नसताना नोटीसा दिल्या. तसेच मागील बजेटमध्ये ३ कोटी गुंठेवारी भागात विकास कामासाठी ठेवले होते, किती खर्च झाले. गावठाण भागात ही नोटीसा दिल्या, तेथे खर्च होत आहे. याचा अर्थ बेकायदेशीर खर्च सर्व्हेवर त्या भागात होत आहे.

मा. सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना हे सभागृहात उपस्थित नाहीत. ते कार्यालयीन कामानिमित्त मंत्रालय, मुंबई येथे गेलेले आहेत. गुंठेवारीसाठी ३ कोटी ठेवले होते. सर्व्हेशिवाय गुंठेवारी भागात कोणतेही काम झाले नाही. सन २००६-०७ या वर्षात गुंठेवारी भागात कामे होण्यासाठी ५ कोटीची तरतूद केलेली आहे. गेल्या वर्षी ३ कोटीपैकी फक्त १०-१२ लक्ष खर्च करण्यात आले आहेत. गुंठेवारीच्या नियमात बदल करणे व त्यासाठी शासनाचे मार्गदर्शन घेण्याची गरज होती. आता यानंतर गुंठेवारी भागात विकास कामे करण्यात येतील. तसेच जो विकास खर्च येणार आहे तो व इतर ५ कोटी असे एकूण १५-२० कोटी खर्च गुंठेवारी भागात यावर्षी खर्च होतील. अर्थसंकल्पाच्या संदर्भात काही सूचना असतील त्या कराव्यात.

सौ. लता दलाल : पाणीपट्टीमध्ये जी वाढ सुचविली आहे ती अयोग्य आहे. योग्य प्रकारे वसूली झाली तर जनतेवर कर वाढवून बोजा टाकण्याची गरज नाही. पाणीपट्टी वाढीला विरोध आहे. १०% गुंठेवारी भागासाठी दंडात्मक कार्यवाहीची अट रद्द करावी. त्या त्या विभागासाठी लमसम बजेट ठेवावे. जे प्रस्ताव स.सदस्यांकडून येतील ते त्यातून खर्च करावा. वॉर्ड क व ड च्या अंतर्गत येणाऱ्या वॉर्डाच्या सदस्यांनी ज्या ज्या कामासाठी तरतूद ठेवण्यासंबंधी पत्र दिले ते नमूद केलेले दिसून येत नाही. लमसम रक्कम टाकून त्या त्या प्रभागासाठी तरतूद करावी. अनेक कामे स्पीलओव्हरमध्ये दाखवली आहेत. ती कामे यावर्षीच्या बजेटमध्ये उल्लेख होणार असेल तर

तो मान्य नाही. पुढील वर्षीची कामे ही पुढील वर्षातच घ्यावी. एप्रिल मध्ये स्पील ओव्हरची बिले देण्यात येत असतील तर हरकत नाही. नवीन कामावर त्याचा परिणाम होऊ नये. तसेच पर्यटन, सांस्कृतिक विभागासाठी ४० लक्षची तरतूद करण्यात यावी. उद्या ान विभागासाठी ठेवलेली १ कोटीची तरतूद असून तूर्त उद्यान शिफ्ट करू नये ती रक्कम विकास कामासाठी वापरण्यात यावी. माझ्या वॉर्डात दोन शाळांना देखभाल दुरूस्तीसाठी मागील बजेटमध्ये तरतूद होती. एक लक्ष कमी तर केलेच परंतु ते काम स्पील ओव्हरमध्ये टाकण्यात आले. अशा पव्रकारच्याि चुका आहेत त्या दुरूस्त कराव्यात. स्पील ओव्हरची रक्क्म यावर्षीच्या बजेटमधून घेऊ नये. पाणीपट्टीत वाढ करू नये.

श्री. मुजीब खान : रोशनगेट, मकसूद कॉलनीतील एका कामाचे अंदाजपत्रक १.५० लाखाचे केले, प्रत्यक्षात ३ लक्षच्यावर खर्च होतील. असे अनेक कामांच्या बाबतीत होते. अनेक कामे एक दीड लक्षमध्ये होतील म्हणून नमूद केले परंतु ती कामे एवढया रक्कमेत होणे शक्य नाही. म्हणून तरतूद वाढविण्याची आवश्यकता आहे. ४-५ लक्षच्या कामासाठी २ लक्ष तरतूद केली त्यामुळे काम पूर्ण होणर नाही. दुरूस्ती करावी. मा.सभापती यांना सर्व दुरूस्तीचे अधिकार देण्यात यावेत.

श्री.साहेबराव कावडे : मागील वर्षी माझ्या वॉर्डातील कामे वगळण्यात आली ती स्पीलओव्हरमध्ये घेण्यात यावी. माझ्या वार्डातील एक काम तीन वर्षापासून प्रलंबीत आहे. ठेकेदार काम सोडून गेले ते कामही स्पीलओव्हरमध्ये आलेले नाही याचा खुलासा करावा. तसेच डॉ.आंबेडकर पुतळ्याच्या छतासाठी बजेट होते ते यात नमूद नाही.

उप अभियंता(स्लम) : चिकलठाणा येथील कॉंक्रीटचे काम आहे. सदर काम याच वर्षी पूर्ण होणर असून १२ दिवस बाकी आहेत म्हणून स्पीलओव्हरमध्ये आलेले नाही.

श्री.गजानन बारवाल : पूर्ण शहरात जलनिःसारण वाहिन्या टाकणार आहे. त्यासाठी नाले दुरूस्त करणे आवश्यक आहे. ते यात आलेले नाही. भूसंपादन करणार नसेल तर रस्ते तयार कसे करणार, जास्तीत जास्त जागा खरेदी करण्यासाठी तरतूद करण्याची गरज आहे. गावठाण भाग जसे पदमपुरा येथे मोठ्या जागाच नाही, अशा भागात जागा संपादन करावी लागणार आहे त्याकडे लक्ष द्यावे. शहरात २२ आरोग्य केंद्र असून तेथे कामही सुरू आहे परंतु पुरेशा सुविधा नाहीत. कुत्रा चावल्यानंतर साधे श्वानदंश प्रतिबंधक इंजेक्शन मिळत नाही. तसेच प्रसूतीसाठी सुविधा देऊ शकत नाही. सिध्दार्थ उद्यानाकडेच न बघता या शहरात मोठमोठ्या सोसायटी आहेत, मोठमोठे प्रोजेक्ट आहेत त्या ठिकाणी उद्यानाची आवश्यकता आहे हे काम हाती घ्यावे. अनेक ठिकाणच्या पुतळ्यांची पाहणी करून तेथे संरक्षणासाठी लक्ष देणार होतो. तसेच नवीन पुतळे उभारण्याचा मानस होता त्यासाठी बजेटमध्ये तरतूद दिसून येत नाही. महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी विशेष तरतूद करण्यात यावी. अनेक इमारती नादुरूस्त असून त्या वापराअभावी पडून आहेत त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सिडको भागासाठी १५ कोटीची तरतूद कमी पडणार असून त्यावर विचार व्हावा. नगरसेवकांचा स्वेच्छानिधी वाढविण्याची गरज आहे. महापौर चषक क्रिडा स्पर्धा राज्य व राष्ट्रीय पातळीवर व्हाव्यात. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी जास्त तरतूद ठेवण्याची गरज आहे. हास्य कवी संमेलन व इतर मोठे कार्यक्रम घेणे गरजेचे आहे. मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन मनपाने

करावयास पाहिजे. त्यासाठी ४० लक्ष तरतूद ठेवावी. बाल कामगार शाळामध्ये अनेक आहेत त्यासाठी विशेष कल्याणकारी योजना राबविण्याची गरज आहे. मनपा शाळांतील विद्यार्थ्यांचा विमा काढण्याची गरज असून विम्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद दिसून येत नाही. मनपाचे प्रशासकीय काम संगणकीकरण व्हावे. मनपा कर्मचाऱ्यांना गृहकर्ज म्हणून अग्रीम दिले जाते त्यासाठी कांचनवाडी येथे १५००-१६०० एकर जागा असून ती शासनाकडून घेऊन कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान केले तर योग्य होईल. पर्यटन कक्ष स्थापन केला परंतु पर्यटक कसे आकर्षीत होतील यासाठी शहराची जाहीरात व योग्य ते मार्गदर्शक फलक लावावे. गेस्ट हाऊस करावे. नगरपालिका असताना गेस्ट हाऊस होते परंतु महानगरपालिका झ ाली परंतु गेस्टहाऊस नाही. संपूर्ण देशातून तसेच परदेशातून पर्यटक या शहरात येत असतात त्यांचेसाठी सुविधा देऊ शकत नाही. म्हणून एक गेस्ट हाऊस असावे. प्राणी संग्रहालय शिफ्ट करण्यासाठी १ कोटीची तरूद केली परंतु या शहराचे मध्यवर्ती बस स्थानक हे तेथेच आहे. प्राणी संग्रहालय शिफ्ट केल्यास तेथे बघण्यासाठी लाक जातील असे वाटत नाही सध्या शिफ्ट करू नये. ती तरतूद इतर कामासाठी खर्च करावी. अग्निशमन विभागात आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, त्यासाठी जास्तीत जास्त निधी ठेवावा. वाहतुकनगर विकासीत करणार होतो परंतु आजही त्या जागा रिकाम्या आहेत. BOT वर मनपाने विकसीत करण्यासाठी द्याव्या. पदमपुरा भागात मनपाची जागा आहे तेथे BOT तत्वावर विकास करण्यासाठी यात तरतूद नाही ती ठेवावी. वॉर्ड कार्यालय अंतर्गत विकास कामासोठी ३२ कोटीची तरतूद केली ती खूप कमी आहे ती वाढवावी. मनपाकडे जे देणे आहे ते देण्याची कार्यवाही करावी त्यासंबंधी निर्णय व्हावा.

मा. सभापती : बरीच चर्चा स.सदस्यांनी केलेली आहे. अभ्यास करून काही प्रश्न मांडलेले आहेत. सूचना केल्या आहेत. सर्वांचे मत लक्षात घेवूनच सर्व सहमतीने निर्णय देणार आहोत. या अर्थसंकल्पावर निर्णय घेऊन सर्वसाधारण सभेसमोर सादर करणार आहोत. प्रशासनाने काही बाबी सुचविल्या होत्या, त्यावर स.सदस्यांनी मत व्यक्त केल्यानंतर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. गुंठेवारी संदर्भात रक्कम न भरल्यास १०% दंडात्मक आकारणी रद्द करण्यात येते.
२. पाणी पुरवठ्याचे ऑडीट करण्यात यावे. जी तूट येते ती भरून निघेल. पाणी पट्टी वाढवून हा प्रश्न सुटणार नाही. पाण्याची गळती, अनधिकृत नळ कनेक्शन शोधावे.
३. पुंडलिकनगर व इतर अनधिकृत वसाहतीमध्ये पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. समांतर जलवाहिनी टाकण्याबाबत कार्यवाही करावी.
४. BOT वर काही योजना राबविण्यात याव्या. त्यासाठी शासनाची मदत घेण्यासाठीआपण सर्व मिळून प्रयत्न करू. सर्व लोकप्रतिनिधी यासाठी प्रयत्न करू. अनुदान मिळण्यासाठी नगरविकास राज्य मंत्री मा.राजेश टोपे यांची मदत होईल. त्यांनी आश्वासन दिलेले आहे.

५. समांतर जलवाहिनी टाकण्या संदर्भात प्रशासनाने कामास लागावे व या शहरातील नागरीकांना पुरेसे पाणी द्यावे. जोपर्यंत पाण्याचे ऑडीट होत नाही तोपर्यंत पाणीपट्टी वाढ मान्य करता येत नाही.
६. दरवर्षी स्पीलओव्हरमध्ये अनेक कामे जातात ती यावर्षात जास्त येऊ नयेत याची काळजी घ्यावी.
७. नगरसेवकांचा स्वेच्छा निधी वाढविण्या संदर्भात सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन शासनाकडे मान्यतेसाठी पाठपुरावा करू.
८. शहर बस वाहतूक योजना राबविण्यास मनपा सक्षम ठरलेली असून आणखी काही प्रकल्प जसे स्वामी विवेकानंद उद्यानात ३.५० कोटीचा प्रोजेक्ट, महापौर निवासस्थानाजवळ BOT तत्वावर विकास करण्यासारख्या योजना राबविण्यात याव्यात.
९. सिध्दार्थ उद्यानात ७ कोटी रूपये खर्च करून बांधा, वापरा व हस्तांतर करा या धर्तीवर विकासासाठी देतआहोत.
१०. गेल्यावर्षी गुंठेवारी भागातील कामासाठी ३ कोटीची तरतूद होती ती यावर्षी ५ कोटी तरतूद ठेवण्यात येते व जमा होणारा विकास निधी हा त्याच भागात खर्च करावा.
११. सिध्दार्थ उद्यानासाठी ठेवण्यात आलेल्या १ कोटी तरतूदीऐवजी १० लक्ष तरतूद ठेवण्यात येते.
१२. प्राणी संग्रहालयासाठी १० लक्ष तरतूद ठेवण्यात येते.
१३. पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीसाठी जी तरतूद ठेवली त्यातून २ कोटीची कपात करण्यात येते.
१४. भूसंपादनासाठी ४ कोटीची तरतूद करण्यात येत असून १ कोटी कपात करण्यात येत आहे.
१५. जकातीचे उद्दीष्ट जे अभिकत्यामार्फत वसूल करणार तीच रक्कम ठेवण्यात येते.
१६. मालमत्ता कराचे उद्दीष्ट ३२ कोटीऐवजी ४१.५० कोटी करण्यात येते.
१७. नगर रचना विभागाकडून वेगवेगळ्या माध्यमातून १० कोटी ऐवजी १२ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात येत असून त्यात २ कोटीची वाढ सुचविण्यात येत आहे.
१८. मनपाच्या मालकीच्या मालमत्तामधून जे ३.५० कोटीचे उत्पन्न येणार आहे त्यात ५० लक्षची वाढ करण्यात येते.
१९. मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसूली ही ९०% करण्यात यावी. ज्या वॉर्ड कार्यालयाची वसुली समाधानकारक होणार नाही तेथील कर्मचाऱ्यांना जबाबदार धरले जाईल. ज्यांनी चांगली वसुली केली त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल.
२०. सलग तीन वर्ष जे नागरीक मालमत्ता कर व पाणीपट्टी भरतील त्यांना करात १०% सूट देण्यात येते व जे भरणा करणार नाहीत त्यांचेकडून १०% दंडात्मक वसुलीची कार्यवाही करावी.
२१. पाणीपट्टीचे ३५ कोटीऐवजी ३७ कोटीचे उद्दीष्ट करण्यात येते.
२२. डिफर्ड पेमेंटवर १० कोटीचे कामाची कार्यवाही झालेली आहे उर्वरीत कामाबाबत कार्यवाही करावी.
२३. सिडकोकडून १५ कोटी येणार ते सिडको भागासाठी कमी पडणार आहेत. शासनाकडून येणारे अनुदान हे सिडको भागासाठी खर्च करावे.

२४. मनपाच्या शालेय विद्यार्थ्यांना सुविधा मिळण्यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे. गरीब मुलांना शिक्षण मिळालेच पाहिजे. त्यासाठी जेथे शाळा तेथे ग्राऊंड असलेच पाहिजे. नसेल तर बाजुबाजूला जागा असल्यास ते विकसीत करण्यात यावे.

२५. मनपाच्या दवाखान्यामार्फत सोयी सुविधा देण्याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

२६. शालेय विद्यार्थ्यांचा विमा काढण्यासाठी तरतूद ठेवलेली आहे. प्रशासनाने कार्यवाही करावी.

२७. पर्यटन कक्ष उभारले परंतु पर्यटक या शहराकडे जास्तीत जास्त कसे आकर्षीत होतील यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे तसेच पाच ऐतिहासिक दरवाजांच्या सौंदर्यीकरणाचे काम तात्काळ सुरू करावे. आपण मौलीक सूचना केल्या तसेच फेरफार व बदल तसेच कामांचा समावेश करण्याचे जे अधिकार मला दिले त्यानुसार कार्यवाही होईल.

२८. शालेय विद्यार्थ्यांना बुटासह गणवेश देण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी.

२९. महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यासाठी १० लक्षची तरतूद करण्यात येते.

३०. अधिकाऱ्यांवर जबाबदारी ही पगाराशी निगडीत केली आहे. पदोन्नतीशी निगडीत केले.या वर्षीचे धोरण म्हणून स्विकारलेले ते नियमावलीमध्ये तरतुद करावी. जकातीची एक वर्षाची निविदा दिलेली आहे, सर्व उत्पन्न गृहीत धरलेले आहे. मार्च महिन्याचे बजेट हे पुढील वर्षात येणार आहे. प्रत्येक वर्षी एक महिन्याचे बजेट ॲडव्हॉन्स मध्ये येईल. प्रशासनाचे वतीने २७३.७३ कोटी बजेट सादर केले होते. चर्चा झाल्यानंतर वाढ सुचवल्यानुसार २८७.७९ कोटीच्या अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येते व हा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २००५-०६ चे सुधारित अंदाज व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २००६-२००७ चे मुळ अंदाज मा.स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यात आले. सदर बैठकीत सर्वंकष चर्चा होऊन सन २००५-०६ चे सुधारीत अंदाज जमा रक्कम रू.२१२ कोटी ४३ लाख ९५ हजार, यामध्ये प्रारंभीची शिल्लक ०२ कोटी ८० लक्ष ४५ हजार असे एकूण २१५ कोटी २४ लक्ष ४० हजार रक्कमेचा विचार करून खर्च रक्कम रू.१८५ कोटी २१ लाख ७५ हजार इतका लक्षात घेता रू.३० कोटी ०२ लाख ६५ हजार शिलकीच्या सुधारीत अंदाजास मंजुरी देण्यात येते.

सन २००६-२००७ च्या मुळ अंदाजावर सर्व सदस्यांनी अभ्यासपुर्वक चर्चा करून व केलेल्या सुचनांची दखल घेऊन मुळ अंदाजपत्रक रू.२५७ कोटी ७६ लाख १० हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.३० कोटी ०२ लाख ६५ हजार असे एकूण रू.२८७ कोटी ७८ लाख ७५ हजार जमेचा विचार करून खर्च रू.२८७ कोटी ७२ लाख ७० हजार अपेक्षित धरता रू.६.०५ लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावासह सर्वानुमते मान्यता देण्यात येते. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनातर्फे सन २००५-०६ च्या सुधारीत व सन २००६-०७ चे मुळ अर्थसंकल्पात सभापती, स्थायी समिती व स.सदस्यांच्या सल्ल्यानुसार फेरफार व दुरूस्ती करण्यात येऊन प्रस्ताव फेरफार/दुरूस्तीसह मान्य करून मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरीता सादर करण्यास सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिकाऔरंगाबाद